(37)

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CD 807495

अ.क्र. १०८२९ दि. ११/१२/२०२३ मु.शु.रक्कम ५००/-

दस्ताचा प्रकार हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव मे. इंडप्रो इंजिनिअरिंग सिस्टम्स प्रा.लि.

पत्ता गट नं ३०४ कासारअंबोली ता. मुळशी जि. पुणे

दुसऱ्या पक्षकाराचे नांव दी पुएमआरडीए

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता राहुल रघु जाधव - गोरखनाथ ... पुणे

सौ. विणा गोरख किरवे
परवाना क्र. २२०१०४९

मुद्रांक विक्रेत्याची सही

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

29 NOV 2023

प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुणे करिता

NOTARY
P. P. SHELKE
PUNE DISTRICT
REGD. NO. 3911
EXP. DT. 13/03/2027
GOVERNMENT OF INDIA

## ।। हमीपत्र ।।

मी/ आम्ही मे. इंडप्रो इंजीनीरिंग सिस्टम्स प्रा. लि. तर्फे श्री. रविंद्र हनुमंत कुलकर्णी, वय - सज्ञान ,धंदा - व्यवसाय रहणार - गट नं - ३०४ (पै.) , मौजे – कासार अंबोली, तालुका – मुळशी, जिल्हा – पुणे. सदरचे हमीपत्र लिहून देतो कि,

गट नं - ३०४ (पै.) , मौजे – कासार अंबोली, तालुका – मुळशी, जिल्हा – पुणे. येथील हि मिळकत आमच्या मालकी हक्काची असून सदर मिळकत विकसित करण्यासाठी आम्ही अर्ज केलेला आहे. तरी तूर्त या जागी ग्रामपंचायत कडून आम्हाला पुरेसा पाणी पुरवठा घेऊ शकत नाही याची माहिती मला /आम्हाला देण्यात आली असून जागेवरील बोअरद्वारा पाणी उपलबद्ध करून देण्याची किंवा टँकर द्वारा पाणी मिळण्याची सोय वा त्या संबधी आवशक त्या वरिष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी ,भूजल सर्वेक्षण आणि विकास योजना (G.W.S.& D.A.) या कार्यालयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागार मार्फत सदर जागी पाणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणून देण्याची कार्यवाही करणे आमचेवर बंधनकारक राहील.

१. इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील औद्योगिक/ बिगर निवासी वापरासाठी / पिण्यासाठी ग्रामपंचायत पुरेश्या दाबाने पाणी पुरवठा करू शकत नसल्याने पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने मी/आम्ही करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी/आम्ही या हमीपत्र द्वारे स्वीकारत आहे.

२. ग्रामपंचायत मार्फत कोणताही पाणी पुरवठा सुरु न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी/आम्ही कोणत्याही कोर्टाकडे या बाबतीत दावा दाखल करणार नाही.

३. औद्योगिक वापर करताना पाणी पुरवठ्याची वरील प्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष म्हणून स्पष्ट नमूद करून घेण्याची जबाबदारी आमची राहील. जागेवरील परिस्थितीची जाणीव नियोजित औद्योगिक अगर बिगर निवासी धारकांना करून दिल्या नंतर सुद्धा या ठिकाणी पाणी पुरवठा अपुरा झाला तर पुरेसा पाणी पुरवठा होईपर्यंत माझ्या /आमच्या स्वखर्चाने पुरेसा पाणी पुरवठा करून देण्याची माझी /आमची जबाबदारी राहील. ग्रामपंचायतीला तोशीश लागू देणार नाही.

४. टँकरद्वारे किंवा बोअर द्वारे सध्या मिळण्याच्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणावे व त्या रिपोर्ट नुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वारण्यात येईल याची मी/आम्ही काळजी घेऊ .

५. सदरची योजना संपूर्ण रीत्या प्रवर्तक/मालक/विकासक या नात्याने मी/आम्ही अन्य कोनालाही भविष्यकाळात विकल्यास नवीन मालक/विकासक या हमीपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईन व त्याचा समावेश नवीन करारनाम्यात करण्यात येईल याची काळजी घेऊ/घेईल.

६. हे हमीपत्र आमचे वाली वारस यांचेवर बंधनकारक राहील.

७. सदर प्लॉटमधील संदर्भातील कोणत्याही करारामध्ये या हमीपत्राचा वापर करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येइल.

वरील हमीपत्र मी/आम्ही आज दि. ०५ / १२ / २०२३ रोजी राजीखुशीने लिहून दिले आहे.

हमीपत्र लिहून देणार

INDPRO ENGINEERING SYSTEMS PVT. LTD. PUNE

मे. इंडप्रो इंजीनीरिंग सिस्टम्स प्रा. लि.
तर्फे श्री. रविंद्र हनुमंत कुलकर्णी,

NOTARY GOVERNMENT OF INDIA
P. P. SHELKE PUNE DISTRICT REGD. NO. 3911 EXP. DT. 13/08/2027

BEFORE ME

P. P. SHELKE
NOTARY GOVT. OF INDIA
REGD. NO. 3911

भारत INDIA 5 पाँच रुपये FIVE RUPEES NOTARIAL (×5)

Noted and register at serial
no. 265 / 2023